नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०३/२०२६ (सोमवार )**

---

# खुन करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली आजीवन कारावासाची शिक्षा

**पो.स्टे. अरोली** :– फिर्यादी उमेश शेंडे, रा. पवनी, जि. भंडारा यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे अप. ४०/२०२४ कलम ३०२ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील आरोपी आणि मृतक हे पतीपत्नी असुन सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक ०८/०२/२०२४ रोजी यातील आरोपी नामे विजय सुरेश गुरनुले, वय ४५ वर्ष, रा. कोदामेंढी ता मौदा याने त्याची पत्नी मृतक नामे हीरा विजय गुरनुले, वय ३५ (**फिर्यादीची बहीण**) हीला ''तु नेहमी बिमार राहते काही काम करत नाही'' या कारणावरून काठीने बेदम मारहाण करून जिवानीशी ठार केले.अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन अरोली येथे वरप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री किशोरकुमार वैरागडे, पोलीस स्टेशन अरोली यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक ३०/०३/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश कं ०३ श्री एस. एच. ग्वालानी यांनी वरील नमुद **आरोपी विजय सुरेश गुरनुले, वय ४५ वर्ष,रा कोदामेंढी, ता मौदा यास कलम ३०२ भांदवि मध्ये आजीवन कारावास व १०,०००/–रूपये दंड, दंड न भरल्यास सहा महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती कल्पना पी. पांडे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री.

स्नेहल राऊत, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन अरोली, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा रामदास कोराम ब.नं २२४ दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन शिलन वाघमारे ब. नं. ८१८ यांनी मदत केली आहे.

## घरफोडीचे ३ गुन्हे आणि वाहन चोरीचा १ गुन्हा असे ४ गुन्हे उघड, ३ आरोपी अटक, ०१ लाख ४८ हजार ३९० रूपयाचा मुद्देमाल जप्त , स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे फिर्यादी प्रकाश भगवानजी भोले, रा.बाजारगाव ता.जि. नागपुर यांनी रिपोर्ट दिली की, त्यांचे मालकीचे भोले किरणा दुकान आणि बाजारगावातील राहुल किरणा दुकानाचे शटर वाकवुन अज्ञान चोरटयांनी दोन्ही दुकानातुन एकुण २४,७०० /— रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. नमुद रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम ३३१(३), ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयात कोंढाळी पोलीस तपास करीत असतांना स्थनिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी,काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला सदर गुन्हयात समांतर तपासादरम्यान दिनांक २९/०३/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे सदर गुन्ह्यातील **आरोपी नामे सिद्धांत उर्फ बाब्या वीरेंद्र गोसावी, वय १९ वर्ष, रा. एमआयडीसी हिंगणा, नागपूर** हा असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. आरोपीचा शोध घेऊन त्यास **हिंगणा नागपूर** येथुन ताब्यात घेतले. आरोपी कडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केली असता त्याने त्याचे साथीदार नामे **आरोपी क्रं २) राहुल सुनील सिंग, वय २३ वर्ष, राहणार काटोल रोड, कोंढाळी ३) नदीम अहमद शेख, वय २० वर्ष, रा. उमाटे नगर, कोंढाळी आणि अजुन दोन साथीदारांसह पोलीस स्टेशन**

**कोंढाळी हद्दीत घरफोडी व मोटरसायकल चोरीचे गुन्हे केल्याचे कबुल केले. पोलीसांनी आरोपी क्रं २ आणि ३ यांना कोंढाळी येथुन ताब्यात घेतले.**

पोलीसांनी पंचासमक्ष १) होंडा एक्टिवा क्र. एम एच ४०/ सी वाय ११८८ किंमती ५०,०००/— रूपये (चोरीस गेलेले वाहन) २) काळया रंगाची विना क्रमांकाची हिरो स्प्लेंडर किंमती ८०,०००/—रूपये (गुन्हा करण्यासाठी वापरलेले वाहन), ३) विदेशी दारूचे दोन ७५० एम एल चे बॉटल आणि १८० एम एल चे ०६ बॉटल किंमती २७९०/— रुपये ४) रोख रक्कम ७६००/—रूपये ५) एक अँड्रॉइड मोबाईल किंमती ८,०००/— रुपये असा एकूण १,४८,३९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **आरोपी क्र. १) ते ३) यांना अटक करण्यात आली आहे.**

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

१) पो स्टे कोंढाळी गुन्हे रजि.नं. २०१/२०२६ कलम ३३१(४),३०५(अ),३(५) भा.न्या.सं

२) पो स्टे कोंढाळी गुन्हे रजि.नं. २०३/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.स

३) पो स्टे कोंढाळी गुन्हे रजि.नं. १८९/२०२६ कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं

४) पो स्टे सावनेर गुन्हे रजि.नं. ३०१/२०२६ कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं

**असे एकुण ०४ गुन्हे उघड झाले आहे.**




**गुन्हा उघडकीस आणणारे तपास पथक जप्त मुद्देमालासह**

# बकरी चोरीचे ३ गुन्हे उघड, ३ आरोपी अटक , वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा :—** पोलीस स्टेशन वडोदा येथे अज्ञात चोरटयाने बकरी/ बोकड चोरी केल्याचे कलम ३०३ (२) भा.न्या.सं. अन्वये २ गुन्हे नोंद आहेत.

वडोदा पोलीसांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या मार्गदर्शनात सखोल तपास करत असतांना दिनांक ३०/०३/२०२६ रोजी **आरोपी नामे १) अजय प्रकाश जगताप, वय २२ वर्ष, राह. टेकडी तालुका, कामठी जिल्हा नागपूर २) शिव सुभाष कटारे, वय २७ वर्ष, राह. बुधवारी, भारत माता चौक नागपूर ३) रोहित सुभाष कटारे, वय २१ वर्ष, रा. बुधवारी, भारत माता चौक, नागपूर** हे रात्री संशयीत रित्या फिरतांना मिळुन आले. पोलीसांनी त्यांना सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी पोलीस स्टेशन वडोदा व पोलीस स्टेशन मौदा परिसरात बकरी चोरी केल्याबाबत कबुली दिली. पोलीसांनी पंचासमक्ष १) एक बोकड किंमती १५०००/— रुपये २) गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल किंमती ५०,०००/—रूपये ३) यापूर्वी चोरी केलेल्या बकऱ्यांची विक्री करून मिळालेले पैसे रोख ३१,०००/—रूपये असा एकूण ९६,०००/— रुपयांचा माल पंचासमक्ष जप्त केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन पुढील तपास वडोदा पोलीस करीत आहे.

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

१) पोलीस स्टेशन वडोदा अप. क्र. ३४/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं

२) पोलीस स्टेशन वडोदा अप क्र. १०/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं

३) पोलीस स्टेशन मौदा अप क्र. १८६/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं

**असे एकुण ०३ गुन्हे उघड झाले आहे.**




**गुन्हा उघडकीस आणणारे तपास पथक जप्त मुद्देमालासह**

## अवघ्या ५ तासात अपघाताच्या गुन्हयातील वाहन आणि आरोपी निष्पन्न,वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा :—** आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी फॉर्च्युनर वाहन क्र. एम एच ३६ ए पी ९९११ भंडारा येथून नागपूरकडे जात असताना वाहनात मा. श्री. प्रशांत यादवराव पडोळे, खासदार, लोकसभा क्षेत्र भंडारा — गोंदीया हे प्रवास करत होते. सकाळी सुमारे ५.४० वाजताच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर सावली फाटा परिसरात एका अज्ञात ट्रक ट्रेलर चालकाने कोणताही इंडिकेटर न देता अचानक उजव्या बाजूस वळण घेतल्याने फॉर्च्युनर वाहन ट्रकच्या मागील भागावर धडकले. धडकेनंतर ट्रक चालक घटनास्थळावरून पळून गेला.या अपघातात वाहनाचे नुकसान झाले असुन कोणतीही जीवितहानी झाली नाही. वाहनातील सर्व जण सुरक्षित असून कोणालाही दुखापत झालेली नाही. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन वडोदा येथे अज्ञात ट्रक ट्रेलर चालकाच्या विरूध्द कलम २८१ भान्यासं, सह कलम १३४,१८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

**वडोदा पोलीसांनी तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर अवघ्या ५ तासाच्या आत सीएनजी वाहतुक करणारा ट्रक क्रमांक एमएच ३५ ए जे ४१०३ याने अपघात झाल्याचे निष्पन्न केले. सदर ट्रकचा चालक आरोपी नामे विक्रम बहादुर सिंग रा. बारापथ्थर, नागोड, सतना, राज्य**

मध्य प्रदेश हा असल्याचे पोलीसांनी तपासात निष्पन्न केले आहे. पुढील तपास वडोदा पोलीस करीत आहेत.

## हेटामेटी शिवारातील माई फार्म हाऊस मध्ये अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.
## १२ मोबाईल, २ दुचाकी वाहनासह ३ लाख ९९ हजार १५० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण आणि पाचगाव पोलीस यांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक २९/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई कामी उमरेड उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना. पोलीस पथकाला गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन पाचगाव हद्दीतील हेटामेटी शिवारातील माई फार्म हाउस येथे काही ईसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद माहीती वरीष्ठ अधिकारी यांना देवुन पाचगाव पोलीसांसोबत संयुक्तरित्या कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **१) स्वप्नील विजय तरोडे, वय ३४ वर्ष, रा. वसंत नगर, जुना बाबुलखेडा, रामेश्वरी रोड नागपूर २) सुरज चंद्रशेखर पाटील, वय २० वर्ष, रा. जयभीम चौक, हिवरीनगर, झोपडपट्टी, नागपूर , ३) भोजराज एकनाथ राऊत, वय ३० वर्ष, रा. विठ्ठल नगर, मानेवाडा, नागपुर ,४) करण सुखराम नागपुरे, वय २० वर्ष, रा. हिवरीनगर, झोपडपट्टी नागपूर ५) सागर अशोक काळे, वय २८ वर्ष, रा. कामठी जि. नागपूर, ६) पंकज ओमप्रकाश उमरेडकर ,वय ३० वर्ष, रा. पाचपावली नागपूर,७) राजेश सुंदरलाल राठे, वय ४८ वर्ष, रा.जयभीम चौक,हिवरीनगर झोपडपट्टी, नागपूर ८) सुनिल रमेशराव कडू, वय ३४ वर्ष,रा. नवीन सुभेदार लेआउट, अयोध्या नगर नागपूर ९) धनराज मनोहर खापरे, वय ४० वर्ष, रा.ठक्कर ग्राम, पाचपावली, नागपूर,१०) अभिजीत मदन तोंडरे, वय २४ वर्ष, रा. कामठी जि. नागपुर ११) सागर शेषराव साठे, वय ४० वर्ष, रा. नेताजी नगर, नागपूर १२) राकेश मधुकर बारापात्रे, वय ३२ वर्ष,रा.लोहा मार्केट ईतवारी नागपूर १३) दादाराव रुपचंद कडू, वय ५२ वर्ष, रा. टेमसना, ता. कामठी, १४) अनिल मधुकर जांगडे, वय ५० वर्ष, रा. दुर्गा चौक, कामठी हे नागपुर हे जागीच ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना**

मिळुन आले. सदर फार्म हाउस मालक आरोपी क्रं १५) अतुल बालकदास डोंगरे,रा. रामेश्वरी, नागपुर  हा असुन त्याच्या सांगण्यावरून अवैध जुगार सुरू असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.

आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम ८४,१००/—रुपये व एकुण १२ मोबाईल किंमती १,६०,०००/— रुपये , दोन  दुचाकी (सल्व्हर रंगाची होन्डा शाईन मोसा  क्र एम एच ४९/ ए झेड ३४९५ आणि विना क्रमांकाची टिव्हिएस ज्युपिटर मोपेड) किंमती १,५५,०००/—रुपये असा एकुण ३,९९,१५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम ४,५ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



कारवाई करणारे पोलीस पथक

# पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतील मौजा गोंडखैरी येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या ११ आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद हातभट्टया नष्ट करत ०८ लाख ६४ हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

## कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक २८/०३/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा गोंडखैरी शिवारात मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच कळमेश्वर पोलीसांनी घटनास्थळी जावुन कारवाई केली असता **१२ महिला आरोपी या** मोहाफुल सडवा आणि दारू गाळण्याच्या साहीत्यासह हातभट्टी लावुन दारू गाळतांना मिळुन आल्या. नमुद हातभट्टया नष्ट करून मुद्देमाल जप्त केला.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) १९००० लिटर मोहाफुल सडवा रसायन, २) ९६० लिटर मोहाफुल गावठी दारू ३) लोखंडी ड्रम, प्लास्टिक ड्रम इतर साहित्य असा एकुण ८,६४,८००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट केला. नमुद ११ महीला आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ११ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २७ गुन्हे नोंद

दिनांक २९/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, साहित्य असा एकुण ८,७५,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापूर येथे १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन वडोदा** येथे १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे एकुण

५ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे एकुण ५ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे एकुण ११ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २७ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ११२५० मिली देशी दारू, १०१० लीटर मोहाफुल दारू, १९००० लीटर मोहाफुल रसायन सडवा तसेच इतर साहीत्य असा एकुण ८,७५,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**